प्रकरण पाचवे

सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

प्रकरण पाचवे
सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत समस्येचा अभ्यास पाच प्रकरणामध्ये विभागला आहे. चौथ्या प्रकरणामध्ये संशोधकाने संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण केले आहे. या पाचव्या प्रकरणामध्ये संकलित माहितीवरून निघालेले अनुमान केलेल्या शिफारसी तसेच पुढील संशोधनासाठी विषय दिले आहेत.

कुटुंब ही सर्वात महत्त्वाची अनौपचारिक शिक्षण संस्था आहे. बालकाच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये कुटुंबाची भूमिका महत्त्वाची असते. आज पालकांच्या आपल्या पाल्यांकडून असणाऱ्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. व त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी आज पालक वर्ग सतत प्रयत्न करीत असलेला आपणास दिसतो. पण केवळ चांगल्या शाळेत मुलाला दाखल करून त्याचा शैक्षणिक विकास होत नाही. तर त्यासाठी पालकांनी स्वत: प्रयत्न करणं आवश्यक असतं कारण मूल केवळ काही तासापुरतेच शाळेमध्ये असते. त्यांचा जास्तीत-जास्त काळ कुटुंबामध्ये जातो. त्यासाठी कुटुंबामध्ये त्याच्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे आवश्यक असते. त्याचबरोबर पालकांनी आपल्या पाल्याच्या दैनंदिन अभ्यासाकडे लक्ष देणे आवश्यक असते. त्याच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी पालकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक असते. यचबरोबर केवळ अभ्यासविषयक बाबींमध्ये मुलांनी आघाडीवर नसवे तर अभ्यासेतर कार्यकमातपण आघाडीवर असावे यासाठी पालकांनी प्रयत्न करणे व त्यासाठी मुलांना प्रोत्साहन व वेळ देणे आवश्यक असते या बालवयातील मुलांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी वरील बाबींकडे जातीने लक्ष देणे आवश्यक आहे. आजच्या या धकाधकीच्या जीवनामध्ये आजचे पालक आपल्या पाल्याच्या शैक्षणिक विकासामध्ये कितपत सहभाग घेतात व तो घेत असल्यास त्यामध्ये कोणत्या अडचणी येतात याचा शोध घेणे आवश्यक आहे व तो घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले आहे.

५.१ सारांश

समस्येचे विधान

'इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणामधील पालकांचा सहभाग - एक अभ्यास'

संशोधनाची उद्दिष्टे

सदर संशोधनामध्ये इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणामधील पालकांच्या सहभागाचा अभ्यास करण्यात आला. त्यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१. मुलांच्या दैनंदिन अभ्यासामध्ये पालकांच्या सहभागाचा शोध घेणे.

२. मुलांसाठी योग्य शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये पालकांच्या सहभागाचा शोध घेणे.

३. अभ्यासेतर उपक्रमांमध्ये मुलांचा सहभाग वाढावा यासाठी पालकांनी दिलेल्या सहभागाचा शोध घेणे.

६. मुलांच्या शिक्षणामध्ये सहभाग देतांना पालकांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

४. पालकांच्या सहभागाबद्दलच्या शिक्षकांच्या मतांचा शोध घेणे.

५. पालकांच्या सहभागाबद्दलच्या मुख्याध्यापकांच्या मतांचा शोध घेणे.

७. मुलांच्या शिक्षणामधील पालकांचा सहभाग अर्थपूर्ण व्हावा यासाठी शिफारसी करणे.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनामधून कोडोली येथील इ.६ वीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासामध्ये त्यांच्या पालकांच्या सहभागाविषयी निष्कर्ष मिळतील. त्याशिवाय कोडोली सारखी भौगोलिक परिस्थिती असणाऱ्या इतर विद्यार्थी व पालक यांना हे निष्कर्ष लागू पडतील.

संशोधनाच्या परिमर्यादा

१. प्रस्तुत संशोधन हे कोडोली येथील उच्च प्राथमिक स्तरावरील केवळ २०० विद्यार्थी व त्यांच्या पालकांपुरते मर्यादित होते.

२. प्रस्तुत संशोधन विद्यार्थ्यांच्या सांभाळ आई-वडिल किंवा दोघांपैकी एक करतात त्याच्या पुरतेच मर्यादित होते.

संशोधन पद्धती

संशोधकाने प्रस्तुत शोधनिबंधाच्या संदर्भातील संबंधित माहिती मिळविण्यासाठी शैक्षणिक संशोधनाच्या विविध पद्धतीपैकी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला.

नमूना निवड

कोडोली येथील ६ विद्यालयांमधून ४ विद्यालयांची लॉटरी पद्धतीने निवड



वरील आकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे कोडोली येथील मराठी माध्यमाच्या ६ विद्यालयांमधून ४ विद्यालयांची यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली प्रत्येक विद्यालयातून इ. ६ वी च्या ५० विद्यार्थी व ५० पालकांची निवड यादृच्छिकपणे करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रत्येक विद्यालयातील सर्व शिक्षकांची प्रश्नावल्या भरून देण्यासाठी निवड करण्यात

आली. त्याचबरोबर या चारही शाळेच्या मुख्याध्यापकांची मुलाखत घेण्यासाठी नमुना म्हणून निवड करण्यात आली.

संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने संशोधनाच्या अनेक साधनांपैकी प्रश्नावली व मुलाखत या दोन साधनांचा वापर करून माहिती संकलीत केली.

मिळालेल्या माहितीचे विश्लेषण वर्गीकरण व अर्थनिर्वचन केल्यानंतर संशोधकाने त्यावरून अनुमान काढले.

५.२ निष्कर्ष

संशोधनातून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण व अर्थनिर्वचन केल्यानंतर संशोधकाने पुढील निष्कर्ष काढले आहेत.

उद्दिष्ट क्र.१ च्या संदर्भातील निष्कर्ष :

उद्दिष्ट क्र. १ - मुलांच्या दैनंदिन अभ्यासामध्ये पालकांच्या सहभागाचा शोध घेणे.

१. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांचा नियमित अभ्यास घेणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (२०%) आहे. तसेच अल्प (३३%) पालक असे आहेत जे शक्य असेल तेव्हा अभ्यास घेतात, परंतु २५ % पालक असे आहेत की ते पाल्याचा अभ्यासच घेत नाहीत.

२. आपल्या पाल्याला अभ्यासाचे वेळापत्रक स्वत: ठरवून देणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (१५%) आहे. तसेच स्वत: अभ्यासाचे वेळापत्रक ठरविणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणसुद्धा अत्यल्प (२९%) आहे. परंतु निम्म्या (५०%) पालकांच्या पाल्यांनी अभ्यासाचे वेळापत्रकच केलेले नाही.

३. शेजारी बसून पाल्यांचा अभ्यास करून घेणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (२१%) आहे. तर त्याचा त्याला अभ्यास करायला सांगून केला की नाही, ते पाहणाऱ्या

पालकांचे प्रमाणसुद्धा अत्यल्पच (१९%) आहे. याचबरोबर पाल्याला त्याचा त्याला अभ्यास करायला सांगणाऱ्या पालकांचे प्रमाणसुद्धा अत्यल्प (१५%) आहे.

४. आपल्या पाल्याची अभ्यासातील प्रगती जाणून घेण्यासाठी शिक्षकांना प्रत्यक्ष भेटणाऱ्या तसेच त्यांच्याशी फोनवरून संपर्क साधणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (अनुक्रमे २० % व १७ %) आहे. परंतु जवळपास निम्मे पालक (५४%), असे आहेत की ते यासाठी कोणतेही प्रयत्न करीत नाहीत.

५. पाल्याचा अभ्यास घेताना पालकांना शंका आल्यास ती शंका स्वत: शिक्षकांना भेटून विचारणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (१५%) आहे. तसेच आलेली शंका मुलाला शिक्षकांना परत विचारायला सांगणाऱ्या पालकांचे प्रमाणसुद्धा अत्यल्प (२५%) आहे तर काही पालक असे आहेत की ते आलेली शंका सोडून द्यायला सांगतात.

६. बहुतांशी (७०%) विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे त्याची आई अधिक लक्ष देते. तर मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देणाऱ्या वडिलांचे प्रमाण अत्यल्प (६.५%) आहे. तसेच बहिण-भाऊ अभ्यासाकडे लक्ष देतात, अशा विद्यार्थ्यांचे प्रमाणसुद्धा अत्यल्प (अनुक्रमे ७.५% ९.३ %) आहे. परंतु १२ % विद्यार्थी असे आहेत की त्यांच्या अभ्यासाकडे कोणीही लक्ष देत नाही.

७. बहुतांशी (७७%) विद्यार्थ्यांच्या पालकांना आपल्या पाल्याचा अभ्यास घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही.

उद्दिष्ट क्र. २ साठीचे निष्कर्ष

उद्दिष्ट क्र.२ - मुलांसाठी योग्य शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये पालकांच्या सहभागाचा शोध घेणे.

१. पाल्यामध्ये अभ्यासाची आवड निर्माण व्हावी म्हणून त्याला त्याच्या ध्येयाची जाणीव करून स्वयं:प्रेरणा निर्माण करणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (१०%) आहे. तर बक्षिसाचे आमिष दाखविणे, जबरदस्तीने अभ्यास करायला लावणे, अभ्यास केला नाही

तर शिक्षा करणे, अशा बाह्य प्रेरणांचा उपयोग करणाऱ्या पालकांचे प्रमाण त्यामानाने अधिक (अनुक्रमे ३७% ३४%, २२%) आहे.

२. शाळेमध्ये दररोज काय शिकवले हे पाल्यांना विचारणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (२२%) आहे, तसेच पाल्यांना शिकविलेल्या भागापैकी काय समजले नाही. हे विचारणाऱ्या पालकांचे प्रमाणसुद्धा अत्यल्प आहे. तर बहुतांशी(५६%) पालक असे आहेत की ते शाळेमध्ये काय शिकविले याची कुठलीही चौकशी करीत नाहीत.

३. जवळपास निम्मे (४९%) पालक हे मुलाला अभ्यास करण्याचा कंटाळा आला तरी पुन्हा अभ्यासच करायला सांगतात, तर अभ्यासाचा कंटाळा आल्यावर फिरायला घेऊन जाणाऱ्या, त्याच्या आवडीची कामे करायला लावणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (अनुक्रमे- १५% व २२ %) आहे.

४. मुलाचा अभ्यास चांगला व्हावा म्हणून आहाराबाबत वेगळी काळजी घेणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (२०%) आहे.

५. मुलांच्या पाठ्यपुस्तकातील पूर्ण घटकांचे वाचन करणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (३.५%) आहे. बहुतांशी (६३%) पालकांनी थोड्या घटकांचे वाचन केलेले आहे. तर ३३ % पालक असे आहेत की त्यांनी एकाही घटकांचे वाचन केलेले नाही.

६. पाल्याची अभ्यासातील प्रगती जाणून घेण्यासाठी त्याच्या शाळेला प्रत्येक महिन्याला अथवा दोन महिन्याला भेट देणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (११ % व १९ %) आहे. त्यामानाने सहा महिन्याला भेट देणाऱ्या पालकांचे प्रमाण अधिक (३२%) आहे. तर २८% पालक असे आहेत की ते या संदर्भात शाळेला कधीही भेट देत नाहीत, हे प्रमाण लक्षणीय आहे.

उद्दिष्ट क्र. ३ साठीचे निष्कर्ष

उद्दिष्ट क्र. ३ - अभ्यासेतर उपक्रमांमध्ये मुलांचा सहभाग वाढावा यासाठी पालकांनी दिलेल्या सहभागाचा अभ्यास करणे.

१. आपल्या पाल्याने अभ्यासेतर कार्यक्रमामध्ये सहभाग घ्यावा असे वाटणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (४१%) आहे. तर बहुतांशी (५९%) पालकांना असे वाटते की, आपल्या पाल्याने अभ्यासेत्तर उपक्रमांमध्ये सहभाग घेऊ नये.

२. आपल्या पाल्याला अभ्यासेतर उपक्रमामध्ये सहभागी करून घ्यावे अशी विनंती शिक्षकांना करणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (२४%) आहे. तर बहुतांशी (७६%) पालक असे आहेत की, ते अशी कोणतीही शिफारस शिक्षकांना करीत नाहीत.

३. अभ्यासेतर उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आपल्या पाल्याची विशेष तयारी करून घेणाऱ्या पालकांचे प्रमाण अल्प (४०%) आहे. तर बहुतांशी (६१%) पालक असे आहेत, की जे आपल्या पाल्याची अशी कुठलीही तयारी करून घेत नाहीत.

४. पाल्याची आवड जोपासण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पालकांचे प्रमाण अल्प (३८%) आहे, तर बहुतांशी (६२%) पालक असे आहेत की जे ही आवड जोपासण्यासाठी कोणतेही प्रयत्न करीत नाहीत.

५. पाल्याशी संवाद साधून अवांतर माहिती देण्यासाठी प्रयत्नरत असणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प (२३%) आहे, तर बहुतांशी (७३%) पालक असे आहेत की ते यासाठी कुठलेही प्रयत्न करीत नाहीत.

उद्दिष्ट क्र ६ साठीचे निष्कर्ष

उद्दिष्ट क्र. ६ - मुलांच्या शैक्षणिक विकासामध्ये सहभाग देताना पालकांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

मुलांच्या शैक्षणिक विकासामध्ये सहभाग देताना पालकांना पुढील समस्या येतात.

१. शिक्षणाकडे लक्ष देण्यासाठी आवश्यक तेवढा वेळ देता येत नाही.

२. शाळेतील शिक्षक पुर्णपणे सहकार्य करीत नाहीत.

३. अभ्यास कसा घ्यावा याचीच माहिती नाही.

४. अभ्यासक्रम कठीण वाटतो.

५. पाल्याला घरामध्ये अभ्यास करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही.

६. पाल्याला आवश्यक शैक्षणिक साहित्य वेळेवर पुरवू शकत नाहीत.

७. शाळेद्वारा आवश्यक माहिती वेळेवर पुरवीली जात नाही.

८. अभ्यासेतर उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी मुलांची विशेष तयारी करून घेता येत नाही.

उद्दिष्ट क्र. ४ व ५ साठीचे निष्कर्ष

उद्दिष्ट क्र ४- मुलांच्या शिक्षणामधील पालकांच्या सहभागाबद्दल शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

उद्दिष्ट क्र. ५ - मुलांच्या शिक्षणामधील पालकांच्या सहभागाबद्दल मुख्याध्यापकांच्या मतांचा अभ्यास करणे.

१. पाल्य शाळेमध्ये नियमित वेळेवर हजर असतो याची पालक केव्हा माहिती घेतात यासंदर्भात शिक्षकांचे अनुभव वेगवेगळे आहेत. काही पालक दररोज ही माहिती घेतात, काही पालक आठवड्याला माहिती घेतात. काही पालक महिन्याला अशी माहिती घेतात, परंतू काही पालक असे आहेत की ते कधीही अशी माहिती घेत नाहीत.

२. शाळेमधील पालक सभेसाठी पालकांच्या उपस्थितीबाबत शिक्षकांचे अनुभव वेगवेगळे आहेत. पालक प्रत्येक पालक सभेला उपस्थित असताना असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण अत्यल्प (१७%) आहे तर पालक काही पालक सभांना उपस्थित असतात असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण अल्प (३५%) आहे. तर जवळपास निम्म्या (४५%) शिक्षकांच्या मते पालक पालक सभांना कधीच उपस्थित नसतात. त्याचप्रमाणे सर्व मुख्याध्यापक सुद्धा पालक सभेमधील पालकांच्या उपस्थितीबाबत असमाधानी आहेत.

३. मुख्याध्यापक आणि बहुतांशी (६५%) शिक्षकांच्यामते पालक हे त्यांच्याशी पाल्याच्या अभ्यासातील प्रगतीविषयी चर्चा करतात, तर पालक पाल्याच्या सुप्तगुणांविषयी व

दोषांविषयी चर्चा करतात असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण अत्यल्प (१८%) आहे.

४. मुख्याध्यापक आणि निम्म्या (५४%) शिक्षकांच्यामते जास्त शिकलेले पालक पाल्याच्या शिक्षणामध्ये पूर्णपणे सहभाग देतात.

५. गरज पडली तर पालक शाळेला सहकार्य करतात की नाही यासंदर्भात मुख्याध्यापक व शिक्षकांचे अनुभव वेगवेगळे आहेत. इयत्ता सहावीच्या अल्प (३८%) शिक्षकांच्या मते शाळेला मदतीची गरज लागल्यास मदत करतात. तर अल्प (३२%) शिक्षकांच्यामते पालक कधी-कधी सहाय्य करतात तर ३० % शिक्षकांच्यामते पालक कधीही सहकार्य करीत नाहीत.

६. मुख्याध्यापक आणि इयत्ता सहावीच्या बहुतांशी (७८%) शिक्षकांच्यामते सर्व पालकांना असे वाटते की, मुलांना घडविण्याची पुर्ण जबाबदारी शाळेची व शिक्षकांची आहे.

६. मुख्याध्यापक आणि इयत्ता सहावीच्या बहुतांशी (९०%) शिक्षकांच्या मते पालकांना पाल्याच्या विकासासंदर्भात मार्गदर्शनाची गरज आहे.

५.३ अनुमान

१. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्या नियमित अभ्यास घेणाऱ्या, पाल्याच्या शेजारी बसून अभ्यास करून घेणाऱ्या, सर्व विषयांचा अभ्यास घेणाऱ्या पाल्याची प्रगती जाणून घेण्यासाठी शिक्षकांना प्रत्यक्ष भेटणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प आहे.

२. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्यामध्ये अभ्यासाची आवड निर्माण व्हावी म्हणून स्वयं:प्रेरणा निर्माण करणाऱ्या शाळेत दररोज काय शिकविले याची नियमित चौकशी करणाऱ्या, आहाराबाबत विशेष काळजी घेणाऱ्या, मुलांच्या पाठ्यपुस्तकातील पूर्ण घटकांचे वाचन करणाऱ्या शाळेमधील प्रत्येक पालक सभेला उपस्थित असणाऱ्या, पाल्याच्या शाळेला नियमित भेट देणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प आहे.

३. आपल्या पाल्याने अभ्यासेतर उपक्रमात सहभाग घ्यावा असे वाटणाऱ्या अशा उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी पाल्याची विशेष तयारी करून घेणाऱ्या आणि

पाल्याची आवड जोपासण्यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या पालकांचे प्रमाण अल्प आहे.

४. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना आपल्या पाल्याच्या शिक्षणामध्ये सहभाग देताना पुरेसा वेळ न मिळणे, शाळेतील शिक्षकांकडून सहकार्य न मिळणे, अभ्यास घेताना स्वत:ला अनेक अडचणी येणे, घरामध्ये अभ्यासासाठी पुरेशी जागा नसणे, शाळेद्वारा आवश्यक माहिती वेळेवर न पुरविणे इत्यादी समस्या जाणवतात.

५. शिक्षकांच्या व मुख्याध्यापकांच्या मतानुसार पाल्याच्या उपस्थितीसंबंधी नियमित माहिती घेणाऱ्या, शाळेमधील पालक सभांना नियमित उपस्थित राहणाऱ्या पाल्याच्या सुप्तगुण व दोषांविषयी चर्चा करणाऱ्या, शाळेला मदतीची गरज लागल्यास मदत करणाऱ्या, मुलांना घडविण्याची जबाबदारी शाळेची व कुटुंब या दोघांचीही आहे असे वाटणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प आहे.

५.४ निष्कर्षांची चर्चा

प्रस्तुत संशोधनामध्ये इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणामधील पालकांच्या सहभागाचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये मुलांच्या दैनंदिन अभ्यासामधील पालकांचा सहभाग, शैक्षणिक वातावरण निर्मिती करण्यामध्ये पालकांचा सहभाग, अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमातील पालकांचा सहभाग या सर्वांचा अभ्यास करण्यात आला. तसेच हा सहभाग देतांना पालकांना कोणत्या अडचणी जाणवतात याचा अभ्यास करण्यात आला.

पालकांचा मुलांच्या शिक्षणामधील सहभाग या विषयाशी निगडित पंडित एस. यांनी (१९९९) केलेल्या संशोधनातून असे आढळून आले की, सतत पाल्याच्या शिक्षणाकडे लक्ष देणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प आहे. प्रस्तुत संशोधनातूनही अशाच प्रकारचा निष्कर्ष मिळालेला आहे. पालकांना शाळेमध्ये भेटायला बोलावल्यावर जाणाऱ्या पालकांचे प्रमाण अत्यल्प आहे असे पंत वाय.आर (१९८४) यांनी केलेल्या संशोधनामध्ये आढळून आले. तसेच प्रस्तुत संशोधनातही असाच निष्कर्ष मिळाला. शिक्षक पालक आंतरक्रियेचा प्रमुख विषय विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती असतो असे पाठक एस.एस. (२००८) यांनी केलेल्या संशोधनामध्ये आढळून आले. प्रस्तुत संशोधनातही असाच निष्कर्ष मिळाला. पालकांना

शिक्षणातील त्यांच्या सहभागाविषयी मार्गदर्शनाची गरज आहे असे हग आणि ग्रेस (२००८), यांनी केलेल्या संशोधनामध्ये आढळून आले. प्रस्तुत संशोधनामध्ये सुद्धा तशाच प्रकारचा निष्कर्ष आढळून आला. उच्च शिक्षण घेतलेल्या पालकांचा मुलांच्या शिक्षणामधील सहभाग अधिक आहे असे सुव्हियन एच.आर. (१९८५) यांनी केलेल्या संशोधनामध्ये आढळून आले. प्रस्तुत संशोधनामध्ये सुद्धा तशाच प्रकारचा निष्कर्ष आढळून आला. अशिक्षित लोकांचा शिक्षणामधील प्रतिसाद हा कमी आहे असे पंत वाय.आर. (१९८४) यांनी केलेल्या संशोधनामध्ये आढळून आले. प्रस्तुत संशोधनामध्ये सुद्धा अशाच प्रकारचा निष्कर्ष मिळाला.

प्रस्तुत संशोधनाने यापूर्वीच्या संशोधनांच्या पुढे जाऊन पालकांच्या शिक्षणातील सहभागासंबंधीच्या अनेक बाबींवर प्रकाश टाकलेला आहे. यासंबंधीच्या अनेक समस्या दूर करण्यासाठी पालकांचा शिक्षणामधील सहभाग वाढविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न झाल्यास व पालकांना आपल्या जबाबदारीची जाणीव करून दिल्यास मुलांच्या शिक्षणामधील पालकांचा सहभाग हा निश्चितच वाढेल.

५.६ शिफारशी

पालकांसाठी

१. पालकांनी आपल्या पाल्यांच्या अभ्यासासाठीचे वेळापत्रक स्वत: ठरवून द्यावे किंवा ते ठरविण्यासाठी पाल्याची अथवा त्यांच्या शिक्षकांची मदत घ्यावी त्याचप्रमाणे ठरविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे पालकांनी आपल्या पाल्याचा नियमितपणे त्याच्या शेजारी बसून अभ्यास करून घ्यावा.

२. पालकांनी आपल्या पाल्यामध्ये अभ्यासाची आवड निर्माण होण्यासाठी त्याच्यामध्ये स्वयंप्रेरणा निर्माण करावी. त्याच्यासमोर अनेक आदर्श ठेवून त्यामधून ध्येयाची निवड करण्याची प्रेरणा द्यावी व ते ध्येय गाठण्यासाठी अभ्यास करणे कशे गरजेचे आहे. यासंबंधीची जाणीव त्याला करून द्यावी.

३. पालकांनी आपल्या पाल्याची शाळेमधील प्रगती जाणून घेण्यासाठी त्यांच्या शिक्षकांना प्रत्यक्ष भेटावे अथवा त्यांच्याशी फोनवरून संवाद साधावा व त्यांच्याशी पाल्याच्या सुप्तगुणांविषयी, दोषांविषयी व अभ्यासातील प्रगतीविषयी चर्चा करावी. त्याचप्रमाणे आपल्या पाल्याच्या सुप्तगुणांच्या विकासासाठी काय करता येईल याविषयी शिक्षकांचे मार्गदर्शन व सल्ला घ्यावा.

४. पालकांनी आपल्या पाल्याच्या पाठ्यपुस्तकातील सर्व घटकांचे वाचन करावे. त्यासंबंधी स्वत:ला काही अडचणी जाणविल्यास शाळेमध्ये जाऊन शिक्षकांशी चर्चा करून आपल्या अडचणींचे निराकरण करून घ्यावे. त्याचबरोबर शाळेमध्ये दररोज कोणत्या भागाचे अध्यापन झाले. त्यामधील कोणता भाग पाल्याला समजला नाही, यासंबंधीची चौकशी पालकांनी आपल्या पाल्याजवळ नियमितपणे करावी, व न समजलेल्या भागाविषयीचे योग्य मार्गदर्शन पाल्याला करावे.

५. आपला पाल्य शाळेच्या वेळेवर शाळेमध्ये नियमितपणे हजर असतो का याची माहिती पालकांनी प्रत्येक आठवड्याच्या शेवटी शाळेतील शिक्षकांकडून अथवा आपल्या पाल्याच्या सहाध्यायाकडून घ्यावी. याचबरोबर त्याच्या शाळेतील वर्तणूकीविषयीची माहिती सुद्धा पालकांनी घ्यावी याबाबत कोणतीही तक्रार आढळल्यास त्याबाबत पालकांनी आपल्या पाल्याला विश्वासात घेऊन योग्य मार्गदर्शन करावे त्याची चूक त्यांच्या लक्षात आणून द्यावी.

६. शाळेमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या प्रत्येक पालक सभेला पालकांनी नियमितपणे उपस्थित रहावे. त्याचबरोबर पालक सभेमध्ये चर्चील्या जाणाऱ्या विषयावर आपले मत प्रकट करावे, तसेच आपल्या पाल्याला काही अडचणी जाणवत असल्यास त्या अडचणी मुख्याध्यापक व शिक्षकांसमोर ठेवून त्यासंबंधी योग्य चर्चा घडवून आणावी व परस्पर विचार विनिमयाने समस्येवरती तोडगा काढावा.

७. आपल्या पाल्याचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने शाळेमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या सर्व अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याची संधी

आपल्या पाल्याला उपलब्ध करून द्यावी. त्यासाठी आपल्या पाल्याला प्रेरणा द्यावी त्याचप्रमाणे आपल्या पाल्याच्या शिक्षकांनासुद्धा माझ्या पाल्याला सर्व अभ्यासपूरक कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घ्यावे अशी विनंती करावी. व या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी आपल्या पाल्याची स्वत: अथवा एखाद्या प्रशिक्षकामार्फत योग्य ती तयारी करून घ्यावी.

८. पालकांनी आपल्या पाल्याला अभ्यासातील विषयांबरोबरच इतर क्षेत्रातील अवांतर माहिती देण्यासाठी नेहमी तत्पर असलं पाहिजे त्यासाठी पालकांनी पाल्याबरोबर वेगवेगळ्या विषयांशी संबंधित चर्चा करावी, त्याचबरोबर पाल्याला नियमितपणे वर्तमानपत्र, दूरदर्शनवरील बातम्या, अवांतर पुस्तके वाचण्याची सवय लावावी.

९. शाळेमधील शिक्षक जर पूर्णपणे सहकार्य करत नसतील तर त्या शिक्षकांशी प्रत्यक्ष संपर्क साधून आपल्या अडचणींची त्यांना जाणीव करून देऊन त्यांचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न करावा. हे शक्य नसल्यास मुख्याध्यापकांशी संपर्क साधून आपली समस्या मांडणी जर मुख्याध्यापक सुद्धा सहकार्य करीत नसल्यास पालक संघटनेच्या माध्यमातून आपल्या समस्यांचे निराकरण करून घ्यावे.

१०. पालकांनी शाळेद्वारा राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांना त्यांची उपयुक्तता ओळखून योग्य ते सहकार्य करावे. त्याचबरोबर शाळेद्वारा पालकांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केले जावे यासाठी मुख्याध्यापकांना पालक संघाच्या वतीने शिफारस करावी. किंवा पालक संघाच्या वतीने शाळेमध्ये पालक शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन केले जावे.

शाळांसाठी शिफारशी

१. शाळांनी पालकांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करावे व याद्वारे पालकांना अभ्यासक्रमाची माहिती करून द्यावी, मुलांचा अभ्यास कसा घ्यावा यासंबंधी मार्गदर्शन करावे, त्याचबरोबर अभ्यासपूरक कार्यक्रमांचे महत्त्व पालकांना पटवून द्यावे, तसेच

शिक्षणामधील पालकांची भूमिका किती महत्त्वपूर्ण आहे हे पालकांना पटवून देऊन त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणामधील भूमिकेसंबंधी मार्गदर्शन करावे.

२. मुलांच्या प्रगती संबंधीचा मासिक अहवाल शाळेने पालकांना नियमितपणे पाठवावा त्यामध्ये त्यांच्या पाल्याच्या प्रगती व वर्तनातील उणिवांविषयी सविस्तर माहिती नोंदविलेली असावी. त्याचबरोबर पाल्याच्या सुप्तगुणांविषयीची माहिती पालकांना करून द्यावी व त्या गुणांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यासंबंधी पालकांना मार्गदर्शन व प्रेरणा द्यावी.

३. शाळेमध्ये राबविल्या जाणाऱ्या नवीन उपक्रमांना पालकांचे सहकार्य मिळविण्यासाठी त्या उपक्रमांचे महत्व पटवून देण्यात यावे, त्याचबरोबर पालकांचे सहकार्य मिळविण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या शेवटी 'कुटुंब भेट' उपक्रमांचे आयोजन करावे.

४. शिक्षणामधील पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी आदर्श पालकांच्या सत्काराचे आयोजन शाळेद्वारे वर्षाच्या शेवटी करण्यात यावे, त्याचबरोबर पालकांमधील विशेष गुण ओळखून त्यांचा फायदा सर्व विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी शाळेमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

शासनासाठी शिफारशी

१. शिक्षणामधील पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी शासनाने वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांच्या सहाय्याने पालक प्रबोधनाचे काम करावे व त्यासाठी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करावे.

२. शिक्षणामधील पालकांचा सहभाग कसा वाढवावा यासाठी मुख्याध्यापकांना विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करावे. व त्यातून विविध क्लृप्त्या व तंत्रे यांची माहिती करून द्यावी. व पालक सहभाग वाढविण्यासाठी प्रेरणा द्यावी.

३. मुलांना अभ्यासासाठी योग्य जागा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक वाचनालयांची संख्या वाढवावी त्याचबरोबर शाळांमध्ये रात्रीच्या वाचनालयांची सोय उपलब्ध करून द्यावी.

५.६ पुढील संशोधनासाठी विषय

१. ग्रामीण भागातील पालकांना मुलांच्या शिक्षणामध्ये सहभाग देतांना येणाऱ्या समस्यांचा शोध.

२. मुलांच्या शिक्षणामधील पालकांचा सहभाग व मुलांचे संपादन यांच्या सहसंबंधाचा तुलनात्मक अभ्यास.

३. पालकांचा मुलांच्या शिक्षणातील सहभाग व मुलींच्या शिक्षणातील सहभाग यांचा तुलनात्मक अभ्यास.